**शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवासभत्ता व दैनिक - भत्याच्या दरात सुधारणा करणे**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक - प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २३ जून, २०१०.

पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:संकीर्ण-१००८/प्र.क्र.६५/सेवा-५, दिनांक २९ जानेवारी, २००९
(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:संकीर्ण-१००८/प्र.क्र.६५/सेवा-५, दिनांक १ जुलै, २००९
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३ मार्च, २०१०

## शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या प्रवासभत्त्याचे सुधारित दर वरील (३) येथील दि.३ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील विमान प्रवासविषयक तरतुदींत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

परिच्छेद ४.१ अ) येथील तरतूद पुढीलप्रमाणे वाचण्यात यावी :-

अ) सचिवांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. सचिव व सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना फक्त इकॉनॉमी वर्गानेच विमान प्रवास अनुज्ञेय राहील.

प्रधान सचिव व त्याहून उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांना एअर इंडिया व इंडियन या विमान कंपन्यांच्या विमानाने अथवा खाजगी विमान कंपन्यांच्या विमानाने एक्झिक्युटिव्ह वर्गाने विमान प्रवास अनुज्ञेय राहील. तथापि, खाजगी विमान कंपन्यांच्या एक्झिक्युटिव्ह वर्गाचे भाडे एअर इंडिया व इंडियन या विमान कंपन्यांच्या एक्झिक्युटिव्ह वर्गाच्या भाड्यापेक्षा कमी असल्याची खातरजमा त्यांनी करावी.

तसेच परिच्छेद ४.१ ब) मध्ये सुरूवातीला खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे:-

" विमान प्रवासासंबंधी **एक विशेष बाब** म्हणून शासन असे आदेश देत आहे की, नाशिक, नांदेड, लातूर, सोलापूर, कोल्हापूर आणि औरंगाबाद येथे कार्यरत असणाऱ्या आणि सुधारित वेतन संरचनेमध्ये रू.५४००/- किंवा त्याहून अधिक ग्रेड वेतन घेणाऱ्या गट-अ च्या अधिकाऱ्यांना त्यांच्या शासकीय कामानिमित्त मुंबईला / मुंबईहून येताना - जाताना कोणत्याही सार्वजनिक अथवा खाजगी विमान कंपनीच्या विमानाने विभागीय आयुक्त वा त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने प्रवास करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या प्रवासाच्या खर्चाची खाली नमूद केलेल्या कमाल मर्यादेत प्रतिपूर्ती अनुज्ञेय असेल:-

१) मुंबई - नाशिक रू.१५००/- २) मुंबई - नांदेड रू.२५००/-
३) मुंबई - लातूर रू.२२००/- ४) मुंबई - कोल्हापूर रू.२९००/-
५) मुंबई - सोलापूर रू.१७००/- ६) मुंबई - औरंगाबाद रू.२२००/-

मुंबई येथे कार्यरत असणाऱ्या व वरीलप्रमाणे ग्रेड वेतन असणाऱ्या अधिकाऱ्यांनासुद्धा प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या / विभागीय आयुक्त वा त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने ही सवलत शासकीय कामानिमित्त वरील सहा ठिकाणी जाण्या-येण्यासाठी अनुज्ञेय राहील."

**हे आदेश दि. १ एप्रिल, २०१० पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.** मात्र यासाठी प्रत्यक्ष प्रवास हा दि.३१ मार्च, २०१० च्या मध्यरात्री १२.०० नंतर सुरू झाला असणे आवश्यक आहे. दिनांक १ एप्रिल, २०१० रोजी वा नंतर सुरु झालेल्या दौऱ्याची प्रवासभत्ता देयके या अगोदरच मंजूर केली गेली असल्यास ती पुन्हा विचारात घेतली जाऊ नयेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१००६२३१९१३४७००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( शि. म. म्हात्रे )**
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
सर्व विधानसभा / परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी / मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५

* पत्राद्वारे

---------------------